

**खारघर :** आदिवासी बांधवांना आरोग्य सेवेसाठी रुग्णवाहिका दिली.

# आदिवासी बांधवांसाठी रुग्णवाहिका

खारघर (बातमीदार) : ग्रामीण भागातील आरोग्य सेवा पुरविण्यासाठी क्विक हिल टेक्नोलॉजी सीएसआर शाखेच्या वतीने पनवेलमधील आरएसएस जनकल्याण समितीला रायगड जिल्ह्यातील आदिवासी लोकांना चांगल्या आरोग्य सेवा पुरवण्याकरिता रुग्णवाहिका सुपूर्द  केली. या वेळी सीईओ कैलाश काटकर, अनुपमा काटकर, पनवेल पालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके, धैर्यशील जाधव, रवींद्र साताळकर, विनायक दंभीर उपस्थित होते. आदिवासी वाड्या, गावे तसेच नेरा, तोवेर वाडी, दोधानी, सतीची वाडी, तामसाई, वाघाची वाडी, रानसाई, धामानी, मालडुंगेस सावनसाई, चिंचवली अति दुर्गम भागातील डॉक्टर आणि रुग्णांना प्रवासाकरिता रुग्णवाहिका उपयुक्त ठरणार आहे.